20 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. रूपाली पणदूरकर अभ्यासिकेचे शिवाजी विद्यापीठात उद्‌घाटन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. ॲड. कै. रूपाली पणदूरकर अभ्यासिकेचे उद्‌घाटन डॉ. रामचंद्र आणि हेमकिरण पणदूरकर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. १९ : वेदनेच्या हुंकारावर दातृत्वाच्या फुंकरीने सृजनाचा अंकुर फुलल्याचे दृश्य शिवाजी विद्यापीठात 'डॉ. ॲड. कै. रूपाली पणदूरकर अभ्यासिके'च्या उद्‌घाटन समारंभाच्या निमित्ताने उपस्थितांनी अनुभवले आणि नकळत डोळ्यांच्या कडा ओलावल्या.

विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. रामचंद्र पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी त्यांची दिवंगत कन्या डॉ. रूपाली यांच्या स्मरणार्थ विद्यापीठास दोन टप्प्यांमध्ये ६० लाख रुपयांचा निधी दिला. त्यातून उभारलेल्या दुमजली अभ्यासिकेच्या इमारतीचे उद्‌घाटन हेमकिरण पणदूरकर यांच्या हस्ते कोनशिला अनावरण, इमारतीच्या प्रवेशद्वारावरील फित कापून करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. पणदूरकर म्हणाले, 'रूपालीचे बालपण विद्यापीठातच गेले. ज्या कन्झुमर स्टोअरमध्ये ती लहानपणी चॉकलेट घेण्यासाठी येत असे, त्याच्या शेजारी अभ्यासिकेच्या रूपाने तिचे स्मारक उभे राहात आहे. येथे उपस्थित असणाऱ्या मुलींच्या डोळ्यांत मला ती दिसते आहे. या मुली अभ्यासिकेत अभ्यास करून मोठ्या होतील.' कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'मुख्य विद्यार्थिनी वसतिगृह आणि 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृह जोडण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून, त्यामुळे दोन्हीकडील विद्यार्थिनींना या अभ्यासिकेचा लाभ घेणे सोयीचे होईल.'

राधिका जवळे, महेश साळुंखे, रवी पाटील, संतोष शेखर, सुरेश जगताप यांचा सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, श्रीकृष्ण महाजन, रामचंद्र पवार, रघुनाथ ढमकले, शरद बनसोडे, धनंजय सुतार, गिरीश कुलकर्णी, माधुरी वाळवेकर, दीपक भादले उपस्थित होते.

20 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात शिवरायांचा जयघोष

## देशभरातील स्वयंसेवकांच्या उपस्थितीने शिवजयंतीला लाभले राष्ट्रीय आयाम

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा सोहळा तरुणाईच्या उत्साही वातावरणात झाला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे काढलेल्या शोभायात्रा, हलगी, लेझीम, ढोल व झांजपथकाचे उत्कृष्ट सादरीकरण, जरी-पटक्याचे मिरवणे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत अश्वारूढ युवक यामुळे विद्यापीठाचा परिसर पूर्णपणे शिवमय होऊन गेला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी विद्यापीठात आलेल्या देशभरातील स्वयंसेवकांच्या सहभागामुळे या सोहळ्याला राष्ट्रीय आयाम लाभले.



विद्यापीठात बुधवारी सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यास पुष्प वाहून, त्याचप्रमाणे शिवप्रतिमेसही पुष्पहार घालून अभिवादन केले.

याप्रसंगी विद्यापीठातील वसतिगृहे, विद्यार्थी भवन येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी देशातील बारा राज्यांतील २१ विद्यापीठांतून आलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विद्यापीठ परिसरात ढोल-ताशांच्या गजरात भव्य शोभायात्रा काढली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेतील अश्वारूढ तरुणाच्या रूपाने छत्रपतींचे प्रतिरूप शोभायात्रेत अवतरले. भगवे फेटे आणि शुभ्रवस्त्रांकित तरुणाईमुळे शोभायात्रा लक्षवेधी ठरली.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

20 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठ बनले 'शिवमय'

## तरुणाईचा कलाविष्कार; देशभरातून एनएसएसचे स्वयंसेवक सहभागी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठात आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा सोहळा उत्साही वातावरणात झाला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे काढलेली शोभायात्रा, हलगी, लेझीम, ढोल व झांजपथकाचे उत्कृष्ट सादरीकरण, जरीपटक्याचे मिरविणे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत अश्वारूढ युवक यामुळे विद्यापीठाचा परिसर शिवमय झाला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी विद्यापीठात आलेल्या देशभरातील स्वयंसेवकांच्या सहभागामुळे या सोहळ्याला राष्ट्रीय आयाम लाभले.

सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. त्यांनी आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी शिवजयंती सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराज यांची वेशभूषा करून सहभागी झालेला युवा कलाकार. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.

विद्यापीठातील वसतिगृहे, विद्यार्थी भवन येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी देशातील बारा राज्यांतील २१ विद्यापीठांतून आलेल्या एनएसएस स्वयंसेवकांनी विद्यापीठ परिसरात ढोल-ताशांच्या निनादात शोभायात्रा काढली. शोभायात्रा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर आल्यानंतर तेथे आणि मुख्य प्रशासकीय भवन इमारतीसमोर या विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कारांचे सादरीकरण केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून प्रेरणा घेऊन, व्यापक राष्ट्रहितासाठी त्यांनी दाखविलेल्या मार्गावरून वाटचाल करण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, श्रीकृष्ण महाजन, सुमंतकुमार यादव, तानाजी चौगुले, शरद बनसोडे, धनंजय सुतार, सागर डेळेकर, रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात शोभायात्रा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी शोभायात्रा काढली होती. हलगी, लेझीम, ढोल व झांजपथकाचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत अश्वारुढ युवक सहभागी झाल्याने विद्यापीठाचा परिसर शिवमय होऊन गेला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी विद्यापीठात आलेल्या देशभरातील स्वयंसेवकांच्या सहभागामुळे या सोहळयाला राष्ट्रीय आयाम लाभले.


विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन झाले. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. देशातील बारा राज्यांतील २१ विद्यापीठांतून आलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विद्यापीठ परिसरात ढोल-ताशाच्या निनादात भव्य शोभायात्रा काढली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेतील अश्वारुढ तरुणाच्या रुपाने छत्रपतींचे प्रतिरुप शोभायात्रेत अवतरले. भगवे फेटे आणि शुभ्रवस्त्रांकित तरुणाईमुळे शोभायात्रा लक्ष्यवेधी ठरली.



कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात शिवप्रेमींना शुभेच्छा देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2025

पुढारी



कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज यांची वेशभूषा करून शोभायात्रेत सहभागी झालेला युवा कलाकार. (छाया : नाज ट्रेनर)

# शिवाजी महाराजांच्या जयघोषाने शिवाजी विद्यापीठ भारावले

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

धुक्याने वेढलेला परिसर, आल्हाददायक आसमंत, पारंपरिक व ऐतिहासिक वेशभूषांनी सजलेली तरुणाई, शोभायात्रेचा थाट, हलगी, लेझीम, ढोल , झांजपथकाचा ठेका, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत अश्वारुढ युवक अशा शिवमय वातावरणात शिवाजी विद्यापीठ परिसरात स्फूर्तीचे तरंग उमटले.

सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

देशातील बारा राज्यांतील २१ विद्यापीठांतून आलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विद्यापीठ परिसरात ढोल-ताशांच्या निनादात भव्य शोभायात्रा काढली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

20 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# 'मराठा स्वराज्य निर्मिती'चे शिवरायांच्या चरणी प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. सुमित्रा कुलकर्णी लिखित व डॉ. अवनीश पाटील संपादित 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या पुस्तकाचे बुधवारी शिवजयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचरणी प्रकाशन केले.

डॉ. सुमित्रा कुलकर्णी लिखित व डॉ. अवनीश पाटील संपादित पुस्तक

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३५०व्या शिवस्वराज्य दिनाच्या निमित्ताने गतवर्षी २६ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या विषयावर ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाचे संपादित पुस्तक रूपाने प्रकाशन करावे, अशी सूचना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली होती. त्यानुसार इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी संपादित केलेल्या पुस्तकाचे शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा येथे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत प्रकाशन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार उपस्थित होते.



शिवजयंतीच्या निमित्ताने 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या पुस्तकाचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचरणी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवजयंतीच्या निमित्ताने 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. (छाया : नाज ट्रेनर)

# 'मराठा स्वराज्य निर्मिती' पुस्तकाचे विद्यापीठात प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. सुमित्रा कुलकर्णी लिखित व डॉ. अवनीश पाटील संपादित 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या पुस्तकाचे प्रकाशन शिवजयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या प्रांगणात करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाले अंतर्गत 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या विषयावर ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाचे संपादित पुस्तक रूपाने प्रकाशन करावे, अशी सूचना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केली होती. त्यानुसार इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी संपादित केलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह डॉ. अवनीश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2025

सकाळ



कोल्हापूर : महावीर महाविद्यालय आयोजित पेटंटधारक प्राध्यापकांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर.

# 'नवोपक्रमांचे रूपांतर पेटंटमध्ये करून बौद्धिक संपत्ती समृद्ध करा'

कोल्हापूर, ता. १९ : 'समस्यांकडे एका नवीन दृष्टिकोनातून पाहिल्यास समस्या सोडवण्यासाठी मदत होते. त्यामुळे बौद्धिक समृद्धी वाढते आणि सामान्य असणारी व्यक्ती असामान्य होऊन जाते. एवढी मोठी ताकद नवोपक्रमामध्ये असते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.'

महावीर महाविद्यालय आयोजित पेटंटधारक प्राध्यापकांचा सत्कार झाला. चेअरमन ॲड. के. ए. कापसे अध्यक्षस्थानी होते. सचिव मोहन गरगटे उपस्थित होते.

ॲड. कापसे म्हणाले, 'पेटंटधारक प्राध्यापकांचा सत्कार केल्याने इतर प्राध्यापकांना प्रोत्साहन मिळून पेटंटची संख्या वाढण्यास मदत होईल. डॉ. रोहित पाटील, प्रा. स्वप्नील पाटील, प्रा. स्वप्नाली जगदाळे, विनायक यादव यांनी पेटंट प्राप्त केल्यामुळे महावीर महाविद्यालयाचा लौकिक वाढला आहे. पेटंटधारकांनी घनकचऱ्यासारखी समस्या सोडवण्यासाठी मूलभूत संशोधन करावे. समाजपयोगी संशोधन करून समाजाचे ऋण फेडावे.' प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. उषा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. गोपाळ गावडे यांनी परिचय करून दिला. डॉ. शिरीष शितोळे यांनी आभार मानले. प्रा. संध्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रोहित पाटील यांनी सॉफ्टबॉल खेळातील पेटंट विषयी विवेचन केले तर स्वप्नील पाटील यांनी वैद्यकीय कचऱ्यापासून खत निर्मितीच्या पेटंट विषयी माहिती दिली. कृत्रिम त्वचेसाठी मिळालेल्या पेटंटविषयी सांगितले. विनायक यादव यांनी मानसशास्त्रातील मिळालेल्या पेटंटविषयी माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
19 FEB 2025
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिवराय लोककल्याणकारी तत्त्वे स्वराज्यात रुजविणारे राजे : नलावडे

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : छत्रपती शिवराय लोककल्याणकारी तत्त्वे स्वराज्यात रुजविणारे कर्तुत्त्ववान राजे होते, असे प्रतिपादन शिवचरित्र अभ्यासक राहुल नलावडे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व संशोधक विद्यार्थ्यांतर्फे 'शिवजन्मोत्सव सोहळा २०२५' अंतर्गत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. त्यांनी 'कणखर नेतृत्त्वासाठी शिवनीती' विषयावर संवाद साधला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान झाले.

नलावडे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे विश्वबंधुत्व, विश्वकल्याण हे शब्द प्रत्यक्षात उतरवून समता, न्याय, बंधुता, स्वातंत्र्य आणि सुरक्षितता ही लोककल्याणकारी तत्त्वे स्वराज्यात रुजविणारे राजे होते. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना शिवचरित्र अभ्यासक राहुल नलावडे.

असेल, तर स्वराज्य निर्मितीमागील शिवनीती समजून घ्यायला हवी. सर्वांच्याच नेतृत्त्व गुणाला अधिक कणखर करणारे 'शिवनीती'तील सार प्रत्येकासाठी महत्त्वाचे आहे. जगाचा इतिहास शिवाजी महाराजांशिवाय अपूर्ण आहे. महाराज जेवढे समर्थ सेनानी होते, तेवढेच तत्पर प्रशासक होते. दुर्गकारण, अर्थकारण, समाजकारण, आरमार या सर्वांवरील कार्यकर्तृत्वाने मोठी छाप त्यांनी पाडली.'

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, शिवरायांनी दिलेला संदेश खऱ्या अर्थाने समजून घेतल्यास तरुणांच्या आयुष्याला निश्चित यशस्वी दिशा सापडेल, असा विश्वास व्यक्त केला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते. शुभम गिरीगोसावी यांनी प्रास्ताविक केले. पवन कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. गजानन सोनवणे यांनी आभार मानले.

## पोवाड्याने सभागृह रोमांचित

■ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला युवा शाहीर डॉ. अमोल रणदिवे यांच्या शाहिरी पोवाड्याचे सादरीकरण झाले. यामुळे शिवजयंतीच्या पूर्वसंध्येपासूनच विद्यापीठ परिसरातील वातावरण रोमांचित झाले. त्यानंतर मर्दानी खेळांचे सादरीकरण, महाराष्ट्र संस्कृती शिवराज्याभिषेक सोहळ्यासही उपस्थितांचा प्रतिसाद मिळाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2025
लोकमत

# तरुणाईच्या आकर्षक सादरीकरणाने विद्यापीठ शिवमय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी शिवजयंती सोहळा तरुणाईकडून उत्साही वातावरणात झाला. विद्यार्थ्यांनी काढलेल्या शोभायात्रा, हलगी, लेझीम, ढोल व झांजपथकांचे उत्कृष्ट सादरीकरण, जरीपटक्याचे मिरविणे, शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत अश्वारूढ युवक यामुळे विद्यापीठाचा परिसर शिवमय झाला.

कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी देशभरातील २१ विद्यापीठांतून आलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ढोलताशाच्या निनादात शोभायात्रा काढली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2025
सकाळ

# आवाज अभिनयाचे प्रभावी माध्यम : प्रभाकर वर्तक

## शिवाजी विद्यापीठात नाट्य कार्यशाळा



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित नाट्य कार्यशाळेत बोलताना ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर वर्तक.**

कोल्हापूर, ता. १९ : आवाज हे अभिनयाचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर वर्तक यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे 'आवाज, अभिनय आणि रंगभूमीच्या वेगळ्या वाटा' विषयावर आयोजित नाट्य कार्यशाळेत ते बोलत होते. नाट्यशास्त्र अधिविभागात कार्यशाळा झाली.

या वेळी वर्तक यांनी आवाज आणि अभिनय यांचा परस्पर संबंध कसा असतो, आवाज निर्मिती कशी होते, आवाज कसा असावा, आवाजातील गुण-दोष कोणते, आवाजाचे मूल्यमापन कसे करावे, याविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी भाषेचे गुण-दोष, भावना दर्शकता, प्राणायमाचे प्रकार व त्यांची प्रात्यक्षिके, योग्य उच्चार पद्धती व प्रात्यक्षिके, संवाद कसा समजून घ्यावा, रंगभूमीवर सामाजिक प्रश्नासाठी वापरल्या गेलेल्या पद्धती (प्लेबॅक थिएटर आणि फोरम थिएटर) विषयांवर विचार मांडले. नाट्यशाखेचे डॉ. संजय तोडकर, रवीदर्शन कुलकर्णी, राज पाटील, युवराज केळुसकर, किरणसिंह चव्हाण उपस्थित होते. मल्हार जोशी व अतुल परीट यांनी संयोजन केले. संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी स्वागत केले. डॉ. राजश्री खटावकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
20 FEB 2025
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य क्रीडा महोत्सवासाठी विद्यापीठाचा संघ रवाना

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे होणाऱ्या २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना झाला. त्यात ॲथलेटिक्स पुरुष व महिला, व्हॉलीबॉल पुरुष व महिला, कबड्डी पुरुष व महिला, खो-खो पुरुष व महिला, बॅडमिंटन पुरुष व महिला, बास्केटबॉल पुरुष व महिला, टेबलटेनिस पुरुष व महिला, बुद्धिबळ पुरुष व महिला या सर्व क्रीडा प्रकारांत ७६ पुरुष आणि ७६ महिला खेळाडू त्याचबरोबर २० प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक असा १७२ जणांचा समावेश आहे.



कोल्हापूर : गोंडवाना विद्यापीठातील राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी रवाना होणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आदींनी शुभेच्छा दिल्या.



संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. डी. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, पथकप्रमुख प्रा. डॉ. एन. डी. पाटील, सुनील चव्हाण, किरण पाटील, संजय पाटील, आकाश बनसोडे, देवेंद्र बिरनाळे, श्रीदेवी पवार, स्वप्नील पाटील, रमेश पाटील, हर्षल पाचोरे, संदीप पाटील, गणेश सिंहासने, राजेंद्र रायकर, सुचय खोपडे, आदींनी शुभेच्छा दिल्या.